# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचनाक्रमांक २००७/(३२२/०७) विशी -४ महाराष्ट्र विपीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६

(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनिम क्रमांक (६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन व विद्यापीठविकास विभाग)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पेक्स, गडचिरोली ४४२६०५

फोन /फॅक्स नंबर ०७१३२ - २२३१०४ Email-gug.registrar@gmail.com


**गो.वि./मविविवि/ 258 /२०२४** **दिनांक: ०८/ ०२/२०२४**

# परिपत्रक

विषय -शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन बी.सी.ए.,बी.बी.ए.,बी.एम.एस.,बी.डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन या अभ्यासकमांच्या महाविद्यालयांच्या मान्यतेबाबत.

संदर्भ -१. अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद यांचे पत्र दिनांक २९/०१/२०२४

२. श्री.प्रशांत होळकर मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे ई-मेल दि.०८/०२/२०२४

विद्यापीठाशी संलग्नित सर्व संस्था/महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता नविन महाविद्यालयांना इरादापत्र मंजूर करण्याचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेले आहे.सदर प्रस्तावांमध्ये काही संस्थांच्या बी.सी.ए., बी.बी.ए., बी.एम.एस., बी.डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन या अभ्यासकमांच्या नविन महाविद्यालयांचा समावेश आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत पोर्टलवर दिनांक ०६/१२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या (HAND BOOK) मध्ये बी.सी.ए., बी.बी.ए., बी.एम.एस.,बी.डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन या अभ्यासकमांचा समावेश आहे. विद्यापीठ अनुदान आयोगानेही त्यांच्या दिनांक ०८.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बी.सी.ए.,बी.बी.ए., बी.एम.एस. हे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद AICTE मार्फत नियंत्रीत REGULATE केले जाणार आहेत. जे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद AICTE मार्फत नियंत्रित केले जातात त्या महाविद्यालयांना अंतिम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही AICTE मार्फत केली जाते.

AICTE ने त्यांच्या अधिनस्त अभ्यासक्रमांशी संबंधीत महाविद्यालयांसाठी नवीन प्रस्ताव सादर करण्याच्या अंतीम मुदतीबाबतच्या जाहिरातीची प्रत सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे. वरिल अभ्यासक्रमांकरीता नविन महाविद्यालय मिळणेसाठी अर्ज केलेल्या तसेच विद्यापीठामार्फत शिफारशीत केलेल्या संस्थांनी विहित मुदतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद कडे नोंदणी करणे अनिवार्य आहे. आपण संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन पुढील कार्यवाही घ्यावी व तसा अहवाल विद्यापीठात सादर करावा.

**सहपत्र : संदर्भीय पत्र**

**डॉ.अनिल हिरेखण**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रति,**

**मा. संस्था अध्यक्ष /प्राचार्य**
**सर्व संलग्नित महाविद्यालये**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रतिलिपी,**

१) **मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**
२) **मा. प्र-कुलगरु यांचेकार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

11:26

# Dr. Anil Hirekhan ...

Today, 10:10 pm



**Email** **PRASHANT RAMRAO HOLKAR**

**बी.सी.ए., बी.बी.ए., बी.एम.एस., बी. डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या मान्यतेबाबत.**

**From :** PRASHANT RAMRAO HOLKAR <mashi4-hted@mah.gov.in> — Sat, Feb 03, 2024 05:28 PM

**Subject :** बी.सी.ए., बी.बी.ए., बी.एम.एस., बी. डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या मान्यतेबाबत. — 3 attachments

**To :** reg@sgbau.ac.in, registrar <registrar@bamu.ac.in>, registrar gondwanauniversity <registrar.gondwanauniversity@gmail.com>, University Pune <regis@unipune.ac.in>, registrar <registrar@fort.mu.ac.in>, registrar <registrar@nmu.ac.in>, Raju E Hiwase <registrar@nagpuruniversity.nic.in>, registrar <registrar@unishivaji.ac.in>, registrar <registrar@sus.ac.in>, registrar <registrar@srtmun.ac.in>, registar <registar@sndt.ac.in>, gug registrar <gug.registrar@gmail.com>, pvc@sndt.ac.in

**Cc :** cbpatil minister <cbpatil.minister@gmail.com>, psec higheredu <psec.higheredu@maharashtra.gov.in>, ASHOK SHANKAR <ashok.mande@nic.in>, director@dtemaharashtra.gov.in, Prasha Branch <prash.dhepune@gov.in>, director dhepune <director.dhepune@nic.in>

3321 ... 8.2.24
जावक क्र.............दिनांक..........

प्रति,
कुलसचिव,
सर्व संबंधित सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य

**विषय:- बी.सी.ए., बी.बी.ए., बी.एम.एस., बी. डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या मान्यतेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन 2024-25 या शैक्षणिक वर्षाकरीता नवीन महाविद्यालयांना इरादापत्र मंजूर करण्याचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेले आहेत. सदर प्रस्तावांमध्ये काही संस्थांच्या बी.सी.ए., बी.बी.ए., बी.एम.एस., बी. डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन या अभ्यासक्रमांच्या नवीन महाविद्यालयांचा समावेश आहे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत पोर्टलवर दिनांक ०६.१२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या Hand Book मध्ये बी.बी.ए., बी.सी.एस., बी.एम.एस., बॅचलर ऑफ डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझायनिंग या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. विद्यापीठ अनुदान आयोगानेही त्यांच्या दिनांक ०८.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलगुरूंना कळविले आहे की, पुढील शैक्षणिक वर्षापासून बी.बी.ए., बी.सी.एस., बी.एम.एस. हे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत नियंत्रित (Regulate) केले जाणार आहेत. जे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत नियंत्रित केले जातात त्या महाविद्यालयांना अंतिम मान्यता देणेबाबतची कार्यवाही AICTE मार्फत केली जाते.

AICTE ने त्यांच्या अधिनस्त अभ्यासक्रमांशी संबंधित महाविद्यालयांसाठी नवीन प्रस्ताव सादर करण्याच्या अंतिम मुदतीबाबतच्या जाहिरातीची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. त्यामुळे सार्वजनिक विद्यापीठांमार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर केलेल्या इच्छुक संस्थांनी विहित मुदतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) कडे नोंदणी करणेबाबत सर्व संस्थांना आपल्या स्तरावरून तात्काळ कळविण्यात यावे.

AICTE च्या मानकांप्रमाणे आवश्यक असणाऱ्या निकषांच्या पुर्ततेबाबतचा तपशिल संबंधित संस्थेने विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर तपशिलाची विद्यापीठाने खातरजमा करून संबंधित संस्थांचा ना-हरकत प्रमाणपत्राकरीताचा प्रस्ताव शासनास सादर करावा लागेल. [illegible]